# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २७/०१/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## अवैध गावठी मोहाफुल दारू अड्ड्यात धाड
## पोलिस सटेशन जलालखेडाची कार्यवाही

पो.स्टे. जलालखेडा:— दिनांक २६/०१/२०२२ वा. रोजी पोलिस स्टेशन जलालखेडा येथील पोलिस स्टाफ हे पोलिस स्टेशन जलालखेडा हद्दीत अवैध धंदे रेड कामी गस्त करीत असतांना त्यांना मिळालेल्या गुप्त माहिती वरुन दि. २६/०१/२२ चे १२.१० ते १३.०५ वा. सुमारास मौजा गुमगांव शिवार, कड नदी काठाला रेड केली असता आरोपी नामे— गजानन रामाजी गौरखेडे, रा काकड़ा, ता कारंजा, जि वर्धा हा पोलिसांना पाहून पळून गेला. सदर घटनास्थळाची पाहणी केली असता मोहफुल गावठी दारू साहित्य ४५० लिटर सड़वा कि ४०,५००/—रू., ३० लिटर मोहफुल दारू कि. ६,०००/—रू. असा एकुण कि. ४६,५००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे संजय माळकोटे पो.स्टे. जलालखेडा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ६५ (एफ), ६६(१)(ब) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक तायड़े हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. विययकुमार मगर, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस स्टेशन जलालखेडाचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक श्री. हरिषचंद्र गावडे, सहायक फौजदार सातंगे, पोलिस नाईक तायड़े, पोलिस शिपाई माळकोटे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर